**औरंगाबाद महसूल विभागातील ७ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जेपीएस-२०१७/प्र.क्र.१४२/ई-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०२ मे, २०१९.

**संदर्भ:-**

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जेपीएस-२०१४/प्र. क्र. ७/ई-८, दि. १२ सप्टेंबर, २०१६.
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१/०१/२०१७.
३. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र.२०१७/साप्र/लेखा-४/वाहन /प्र.क्र.५३/कावी-८७,दि. १२/०२/२०१८.
४. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.२०१८/लेखा/उपलेखापाल/कावि दि.१८/०९/२०१८
५. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.२०१७/साप्र/टिआरवाय/वाहन निर्लेखन/कावि ६४ दिनांक २८/०६/२०१८

**प्रस्तावना:-**

औरंगाबाद महसूली विभागातील लेखाशिर्ष “२०५३-जिल्हा प्रशासन" या खाली वेतन आहरीत करणा-या एकूण १३६ क्षेत्रिय अधिका-यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि. १२ सप्टेंबर, २०१६ अन्वये मंजूर केली आहे. उपरोक्त संदर्भाधिन क्र. ३ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अपर आयुक्त औरंगाबाद, जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी त्यांच्या संदर्भाधिन ४ अन्वये तहसिलदार, उस्मानाबाद व उमरगा, तसेच जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांच्या संदर्भाधिन ५ अन्वये उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, तहसिलदार सिल्लोड, सोयगाव, व पैठण या अधिकाऱ्यांना त्यांच्या निर्लेखित केलेल्या वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

औरंगाबाद महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद अपर आयुक्त औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, तहसिलदार, उस्मानाबाद/ उमरगा/ सिल्लोड/ सोयगाव व पैठण या ७ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ होणाऱ्या प्रत्येकी रु. ६.०० लाख याप्रमाणे एकूण रु.४२.०० लक्ष (रुपये बेचाळीस लाख फक्त) कमाल मर्यादेपर्यंतच्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.-

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दिनांक २१/०१/२०१७ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार, सहपत्र -अ॰ मधील पदधारक अधिका-यांसाठी प्रत्येकी रु.६.०० लाखांच्या किंमतीच्या कमाल मर्यादेत (वाहनाची किंमत + वस्तू + सेवा कर + टेम्परररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मूल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भूत करुन) वाहन खरेदी करण्यात यावी.

२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि. ०१/१२/२०१६ व क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २१५/उद्योग-४, दि. २४/०८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वाहन-२०१३/प्र.क्र.४६/१३/विनियम, दि. ०३/१०/२०१७ मधील सूचनांनुसार, वाहन आढाव्या अन्वये औरंगाबाद महसूल विभागाकरीता अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या सर्व १३६ वाहनांची माहिती महावाहन संगणक प्रणालीवर नोंदविण्यात यावी. त्याबाबतचा एकत्रित अनुपालन अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास सादर करावा.

४. नवीन वाहन ज्या पदधारकास मंजूर करण्यात आले आहे, त्या पदधारकाने सदर वाहनाचा वापर संबंधित कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठीच करावा.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) १०१, आयुक्त (०१)(०६) आयुक्त औरंगाबाद (२०५३ ०१२६) बाब क्र.१३- कार्यालयीन खर्च व अनु क्र. २ ते ७ साठी येणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९४ इतर आस्थापना (०१) उप विभागीय आस्थापना (०१)(०६) आयुक्त, औरंगाबाद (२०५३ ०२२४) १३ - कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली मंजूर उपलब्ध तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६६/२०१९/विनियम, दिनांक ०८/०३/२०१९ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५७/२०१९/व्यय-९, दि. ०६/०२/२०१९ अन्वये त्या विभागाने दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५०२१७२९०८४७१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.05.02 17:34:03 +05'30'

**(अजित देशमुख)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

२. जिल्हाधिकारी,औरंगाबाद / उस्मानाबाद .
३. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद
४. तहसिलदार, उस्मानाबाद/ उमरगा/ सिल्लोड/ सोयगाव, व पैठण
५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद / उस्मानाबाद
७. उप सचिव, वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

**सहपत्र 'अ'**

**औरंगाबाद महसूल क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र**

(शासन निर्णय क्रमांक - जेपीएस-२०१७/प्र.क्र.१४२/ई-८, दिनांक ०२ मे २०१९ सोबतचे विवरणपत्र)

| अ.क्र. | जिल्हा | वाहन वापरणा-या अधिका-यांचे पदनाम | निर्लेखित वाहनाचा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | अपर आयुक्त, औरंगाबाद | MH-२०-AS-२००० टाटा इंडिगो |
| २ | औरंगाबाद | उपविभागीय अधिकारी औरंगाबाद | MH-२०-AS-१० टाटा सुमो |
| ३ | उस्मानाबाद | तहसिलदार उस्मानाबाद | MH-२५-C-६२२१ टाटा सुमो |
| ४ | औरंगाबाद | तहसिलदार सिल्लोड | MH-२०-U-९६५३ टाटा सुमो |
| ५ | औरंगाबाद | तहसिलदार सोयगांव | MH-२०-U-९६४५ टाटा सुमो |
| ६ | औरंगाबाद | तहसिलदार पैठण | MH-२०-U-९६४७ टाटा सुमो |
| ७ | उस्मानाबाद | तहसिलदार उमरगा | MH-२५-C-९००९ टाटा सुमो |

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.05.02 17:34:23 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन